आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
३ ऑगस्ट २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनचं काम वेगाने होत असून लौकरच या दोन शहरातलं अंतर केवळ २ तास ७ मिनिटांवर येईल, असं रेल्वे मंत्र्यांचं प्रतिपादन

- विदर्भातली खनिजसंपत्ती, वन उत्पादनं, कापूस उद्योग या जमेच्या बाजू लक्षात घेऊन उद्योजकांना पुढाकार घेण्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं आवाहन

- राज्यात आज अवयवदान पंधरवड्याला प्रारंभ

**आणि**

- संपूर्णता अभियानामधील कामगिरीसाठी चंद्रपूर जिल्ह्याला सुवर्णपदक

**<><><><><>**

मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनचं काम वेगाने होत असून लौकरच या दोन शहरातलं अंतर केवळ २ तास ७ मिनिटांवर येईल असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. गुजरातमधे भावनगर रेल्वे स्थानकात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**- - होल्ड - बाईट- अश्विनी वैष्णव - -**

भावनगर ते अयोध्या या साप्ताहिक गाडीला वैष्णव यांनी हिरवा झेंडा दाखवला. पुण्याहून मध्यप्रदेशातल्या रिवा कडे जाणाऱ्या तसंच जबलपूर ते रायपूर या गाडीचं उद्घाटनही त्यांनी दूरस्थ पद्धतीनं केलं. गेल्या अकरा वर्षात ३४ हजार किलोमीटरचे नवे रेल्वेमार्ग तयार झाले असून भारतीय रेल्वेचं मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे, असं ते यावेळी म्हणाले. देशातल्या तेराशे रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास प्रकल्प हा जगातला सर्वात मोठा प्रकल्प असल्याचंही त्यांनी सांगितलं. मुंबई ते अहमदाबाद ही भारतातील पहिली बुलेट ट्रेन लवकरच सुरू होणार असल्याचंही वैष्णव म्हणाले.

**<><><><><>**

विदर्भातली खनिजसंपत्ती, वन उत्पादनं, कापूस उद्योग या जमेच्या बाजू विकासाच्या दृष्टीनं लक्षात घेऊन उद्योजकांनी पुढाकार घ्यावा, त्याकरता केंद्र आणि राज्य सरकार सर्वतोपरि सहकार्य करेल, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज या उद्योजक संघटनेच्या विदर्भ विभागीय कार्यालयाचं उद्घाटन केल्यानंतर आज नागपुरात  ते बोलत होते.

रायपूर ते विशाखापट्टणम हा महामार्ग पूर्णत्वास जात असताना गडचिरोली त्याला जोडल्यास आंध्रप्रदेशातली बंदरं विदर्भासाठी अधिक जवळची ठरतील असं ते म्हणाले. देशात मालवाहतुकीवरचा खर्च पूर्वी १६ टक्के होता. तो चांगल्या रस्त्यांमुळे आता १० टक्क्यांवर आला आहे आणि भविष्यात तो ९ टक्क्यांवर आणण्याचा आपला प्रयत्न असल्याचं गडकरी यांनी सांगितलं.

<><><><>

जनतेला उत्तम प्रशासनाचा प्रत्यय यावा यासाठी लवकरच धोरणात्मक बदल करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर इथल्या भारतीय व्यवस्थापन संस्था अर्थात 'आयएएम' च्या दोन दिवसीय परिषदेच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात ते बोलत होते. प्रशासकीय यंत्रणेत बदल होण्याची भावना लक्षात घेऊन एप्रिल महिन्यात राज्य स्तरावरच्या सर्व जिहाधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची परिषद घेऊन सहा समित्यांची स्थापना केली गेली. या समित्यांनी अभ्यासपूर्ण शिफारशी केल्या असल्याचं ते म्हणाले.

<><><><>

अमरावती जिल्ह्यातल्या मोर्शी इथं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीय मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचं भूमीपूजन आणि कोनशिला अनावरण झालं. शेतकऱ्यांकडे कृषीच्या जोडीला एखादा जोडधंदा असेल तर त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. मत्स्योत्पादनाद्वारे हे उद्दिष्ट साधलं जाऊ

शकत, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. प्रधानमंत्र्यांच्या दृष्टिकोनानुसार आपल्या नद्या आणि तलावांचा वापर करून देशात नीलक्रांती करण्यासाठी सरकार अनेक योजना राबवत असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्यात आज अवयवदान पंधरवड्याला प्रारंभ झाला आहे. अवयवदान व्यापक समाज चळवळीचे पाऊल या अनुषंगानं राज्याच्या सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागातर्फे राज्यभर हा उपक्रम राबवला जात आहे.

अवयवदान दिनानिमित्त आजपासून १५ ऑगस्टपर्यंत राज्यभरात अवयवदान पंधरवडा पाळला जात आहे. यानिमित्त जनजागृतीपर रॅली, सायकल रॅली, चर्चासत्र, सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. तसंच डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांकरता अवयवदान विषयावर कार्यशाळा, पॅरामेडिकल कर्मचारी आणि आशा सेविका यांच्यासाठीही कार्यशाळेचं आयोजन केलं आहे. १५ ऑगस्ट रोजी प्रत्येक जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या हस्ते अवयवदान करणाऱ्यांच्या कुटुंबाचा सत्कार होणार असल्याचं सार्वजनिक आरोग्य विभागानं सांगितलं आहे.

राज्याचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज अवयवदानाचा अर्ज केला आणि सर्वांना अवयवदान करण्याचं आवाहन केलं.

**होल्ड बाईट आबिटकर**

ठाणे शासकीय रुग्णालयात आज अवयवदान दिनानिमित्त कार्यक्रम झाला. अवयवदान ही सर्वात मोठी मानवसेवा असल्याचं जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर कैलास पवार यावेळी म्हणाले. यावेळी, डॉक्टर, परिचारक, विद्यार्थी उपस्थित होते.

<><><><><>

आकांक्षित जिल्हे आणि तालुके या कार्यक्रमांतर्गत गेल्या वर्षी जुलै ते सप्टेंबर या काळात राबवण्यात आलेल्या संपूर्णता अभियानामधील कामगिरीसाठी चंद्रपूर

जिल्ह्याला सुवर्णपदक मिळालं आहे. चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या वतीने प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन गौरव करण्यात आला. हा सोहळा नागपूर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या सभागृहात झाला. या कार्यक्रमाला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी चंद्रपूर जिल्ह्यातल्या जिवती तालुक्यातले आरोग्य विभागातले कर्मचारी आणि अधिकारी यांच्या कार्याची दखलही घेण्यात आली.

<><><><><>

स्वातंत्र्यसंग्रामातले थोर सेनानी, प्रतिसरकारचे प्रणेते, क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर इथल्या शासकीय निवासस्थानी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशातून नाना पाटील यांना अभिवादन केलं आहे. प्रतिसरकारचे प्रणेते, महान स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिसिंह नाना पाटील यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन, असं पवार आपल्या संदेशात म्हणाले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही क्रांतिसिंहांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केलं. मुंबई इथे मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. मुंबई महानगरपालिका तसंच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातही क्रांतिसिंह नाना पाटील जयंती उत्साहात साजरी झाली. नवी दिल्लीत महाराष्ट्र सदनातही नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

<><><><><>

पुणे जिल्ह्यात यवत इथे झालेल्या हिंसाचाराप्रकरणी आतापर्यंत १५ जणांना अटक झाली असून ५००हून अधिक जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक केलेल्या १५ आरोपींना ६ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात येणार आहे. हिंसाचाराला कारणीभूत ठरलेली वादग्रस्त पोस्ट करणाऱ्या तरुणालाही अटक करण्यात आली आहे. यवतमध्ये सध्या शांतता असून समाज माध्यमांवर पोलीस लक्ष ठेवून आहेत. या प्रकरणाच्या प्राथमिक चौकशीत कोणताही पूर्वनियोजित कट आढळला नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**<><><><><>**

सोलापूर मधल्या दामाजी कारखाना रोड बायपास मार्गावर आज सकाळी एका ट्रकनं दुचाकीला धडक दिल्यानं झालेल्या अपघातात २ महिलांचा मृत्यू झाला. या दोघी एकाच कुटुंबातल्या असून त्या एका धार्मिक कार्यक्रमासाठी जात होत्या. पोलिसांनी ट्रक चालकाला ताब्यात घेतलं असून पुढील तपास सुरु आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ कामगार नेते कॉम्रेड नरसय्या आडम यांच्या नेतृत्वाखाली आज महाराष्ट्र राज्य यंत्रमाग कामगार संघटनेनं मुंबईत आझाद मैदानावर एक दिवसाचं धरणे आंदोलन केलं. यंत्रमाग कामगारांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करावं आणि किमान वेतन लागू करावं अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. तसंच, केंद्रीय औद्योगिक न्यायालयानं २०१९ मध्ये पी.एफ. लागू करण्याचे आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

राज्यातल्या  बनावट डॉक्टरांच्या वाढत्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी आता महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेनं सर्व नोंदणीकृत डॉक्टरांसाठी ‘क्यूआर कोड’ प्रणाली अनिवार्य केली आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय युवक दिनाचे औचित्य साधून जिल्हा एड्स प्रतिबंधक पथक आणि क्रीडा कार्यालयानं अकोला शहरात ‘रेड रन’ स्पर्धा आयोजित केली होती. युवकांमध्ये एचआयव्ही संसर्ग आणि एड्सबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशानं ही स्पर्धा आयोजित केली होती.

<><><><>

सोलापूरमध्ये शिवसेनेच्या सुमारे २१ पदाधिकाऱ्यांनी आज आपल्या पदाचा सामूहिक राजीनामा दिला. शिवसेनेचे संपर्क प्रमुख शिवाजी सावंत यांनीही काही दिवसापूर्वीच आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.

<><><><>

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या आणि अखेरच्या सामन्यात आज चौथ्या दिवसाचा खेळ सुरू आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या दुसऱ्या डावात ३ बाद २०६ धावा झाल्या होत्या. त्यांना विजयासाठी अजूनही १६८ धावांची गरज आहे.

**<><><><>**

येत्या २ दिवसात कोकणात बऱ्याच ठिकाणी तर विदर्भात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. राज्यात सर्वत्र तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याचं पुणे वेधशाळेच्या हवामान वृत्तात म्हटलं आहे.

//<><><><>//